# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** G-२० परिषद पुर्व तयारीच्या अनुषंगाने G-२० परिषदेतील
**{आकाशचिन्ह परवाना विभाग}** समाविष्ट सदस्य देशांचा ध्वज (Flag) नागपूर शहरात विविध ठिकाणी उभारण्याच्या कामांकरीता प्राप्त झालेली मे. मुकुल मोटघरे यांची रू. ६५,४४,४००/- (वस्तु सेवा कर वगळुन) ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

संक्षिप्त टिपणीः-

१. G-२० परिषद पुर्व तयारीच्या अनुषंगाने G-२० परिषदेतील समाविष्ठ सदस्य देशांचा ध्वज (Flag) नागपूर शहरात विविध ठिकाणी उभारण्यासाठी EOI व्दारे एजेन्सी नियुक्त करण्याकरीता वर्तमानपत्रात ई-निविदा क्र. ५८९/पी.आर, ०७.०२.२०२३ तथा शासनाचे सांकेकीत स्थळ, www.maharashtratenders.gov.in वर Tender I.D. No. 2023_NMCN_870802_1 अन्वये निविदा सुचना प्रकाशित करण्यात आली.

२. दिनांक १५.०२.२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत एकाही निविदाकारानी सहभाग घेतलेला नाही.

३. दुस-यांदा (२nd Call) वर्तमानपत्रात ई-निविदा क्र. ६२६/पी.आर, ०७.०२.२०२३ तथा शासनाचे सांकेकीत स्थळ, www.maharashtratenders.gov.in वर Tender I.D. No. 2023_NMCN_874520_1 अन्वये निविदा सुचना प्रकाशित करण्यात आली.

४. दिनांक २४.०२.२०२३ रोजी दुपारी ४.३० वाजेपर्यंत तीन निविदाकार १) मे. बालाजी असोसिएट २) मे. फ्लॅग ॲन्ड पोल्स ३) श्री. मुकुल मोटघरे यांनीनी सहभाग घेतला.

५. EOI प्रपत्रातील अटी नुसार वरील तीन्ही निविदाकारांनी सादर केलेल्या दस्तऐजवाच्या आधारे तीनही एजेन्सींनी आर्थिक बोलीत सहभाग घेण्याच्या पुढील प्रक्रियेसाठी पात्र झाले.

६. तीन्हीही पात्र निविदाकारास आर्थिक बोलीत सहभाग घेण्याकरीता शासनाचे सांकेकीत स्थळ, www.maharashtratenders.gov.in वर Tender I.D. No. 2023_NMCN878467_1 अन्वये Request For Proposa (RFP) आणि BOQ प्रसिध्द करण्यात आली.

७. नियोजीत वेळेनुसार आज दिनांक ०१.०३.२०२३ रोजी निविदा उघडण्यात आली असुन त्यामध्ये तीन्हीही निविदाकारांचे पुढील प्रामणे दर प्राप्त झाले आहे.

| विवरण | मे. फ्लॅग ॲन्ड पोल्स | मे. बालाजी असो. | मे. मुकुल मोटघरे |
|---|---|---|---|
| एकुण आर्थिक बोली दर (वस्तु सेवा कर वगळुन) | रू. ९९,७२,०००/- | रू. ६६,३०,०००/- | रू. ६५,४४,४००/- |

८. उपरोक्त प्रामणे प्राप्त दराच्या आधारे मे. मुकुल मोटघरे यांची रू. ६५,४४,४००/- ची लघुत्तम दराची निविदा मान्य करणे.

९. मे. मुकुल मोटघरे यांची ६५,४४,४००/- (वस्तु सेवा कर वगळुन) ची लघुत्तम दराची निविदा मंजूर करण्यास विभागाची शिफारस आहे.

सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 302/मनपा/प्रशासक** **दिनांक :-03/03/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), आकाशचिन्ह परवाना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत

केल्यानुसार G-२० परिषद पुर्व तयारीच्या अनुषंगाने G-२० परिषदेतील समाविष्ट सदस्य देशांचा ध्वज (Flag) नागपूर शहरात विविध ठिकाणी उभारण्याच्या कामांकरीता प्राप्त झालेली मे. मुकुल मोटघरे यांची रू. ६५,४४,४००/- (वस्तु सेवा कर वगळुन) ची निविदा मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**